# मराठी विभाग

शैक्षणिक वर्ष २०२० – २१ मध्ये पदवीच्या द्वितीय वर्षात मराठी विषयाचे विशेषस्तरावर अध्ययन करण्यासाठी सुमारे ४७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तृतीय वर्षातील मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांची संख्या २७ आहे. एम.ए. मराठीच्या प्रथम वर्षास १८ तर द्वितीय वर्षास ८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. प्राचार्य डॉ. व्ही.डी,कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन अध्यापन व इतर शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. करोनाकाळामुळे संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे अध्यापन व उपक्रम झूमच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. या शैक्षणिक वर्षातील मराठी विभागाच्या वतीने खालील उपक्रम राबविण्यात आले.

**१) स्वातंत्र्यदिनानिमित्त ऑनलाईन निबंध स्पर्धा -**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात दि १ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२० दरम्यान स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेत महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विभागातील सुमारे ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी १) एकमेव लोकमान्य २) साहित्यिक अण्णाभाऊ साठे ३) कोरोनाने मला काय शिकवले ? ४) ऑनलाइन शिक्षणाची व्यवहार्यता... असे विषय देण्यात आले होते.

या ऑनलाईन निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. राहुल राजेंद्र सरोदे – तृतीय वर्ष कला (विषय - कोरोनाने मला काय शिकवले!), द्वितीय क्रमांक कु. मयुरी राऊत – एम.एस्सी. (विषय- साहित्यिक अण्णाभाऊ साठे) तृतीय क्रमांक कु. श्वेता विठ्ठल वनघरे (विषय- साहित्यिक अण्णाभाऊ साठे) या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले.

**२) वाचन प्रेरणा दिन -**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात दि १५ ऑक्टोंबर रोजी **भारतरत्न डॉ. ए . पी. जे. अब्दुल कलाम** यांच्या (१५ ऑक्टोंबर) जन्मदिनानिमित्ताने मराठी विभागाच्या वतीने **'वाचन प्रेरणा दिन'** साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. राजेंद्र सांगळे (नाशिक) यांनी **'वाचन संस्कृतीची बदलती रूपे आणि ई बुक व ऑडिओ बुक'** या विषयावर विद्यार्थ्यांना बहुमोल असे ऑनलाईन मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, कला शाखेचे उपप्राचार्य आणि मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे उपस्थित होते. या ऑनलाईन संवाद सत्रात मराठी विषयाचे विशेष स्तरावर अध्यापन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या प्रसंगी बोलताना डॉ. राजेंद्र सांगळे म्हणाले की, ज्ञानग्रहणासाठी वाचन हे महत्त्वाचे साधन असून विद्यार्थ्यांनी समृद्ध वाचनातून जीवनाकडे पाहण्याची नवी सौंदर्यदृष्टी विकसित करावी असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ राजेंद्र सांगळे यांनी केले. डॉ. राजेंद्र सांगळे यांनी वाचनसंस्कृतीच्या आवश्यकतेवर भर देताना वाचनामुळे मनाची, बुद्धीची एकाग्रता वाढते असे सांगितले. कोरोना काळात वाचनाचे पारंपरिक स्त्रोत असलेली ग्रंथालय बंद असल्याने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्त्रोत शोधून वाचनाची आवड अधिक समर्थपणे जोपासायला हवी. इंटरनेटवर किंडल, गुगल बुक, स्टोरी टेल अशा अनेक ॲपवर ई - बुक व ऑडिओ बुकच्या स्वरूपात दर्जेदार मराठी पुस्तकांचा खजिना उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यायला

हवा. विद्यार्थ्यांनी वाचनासाठी वाचन असे न करता प्रत्यक्ष वाचताना आवश्यक त्या नोंदी करण्याची सवय अंगी बानवायला हवी, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी वाचन वाढले की समज वाढते असे सांगून विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचनाची आवड जोपासायला हवी असे सांगितले. वाचनाची अभिरूची वारसाहक्काने मिळणारी नसून विद्यार्थ्यांनी जे जे उत्तम ते टिपून घेण्याची गुणग्राहकता स्वतःमध्ये रुजवायला हवी असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ बाळासाहेब अनुसे यांनी मानले

**३) ऑनलाइन वाचन कट्टा :**

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने दि. ६ ते ९ ऑक्टोंबर दरम्यान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ऑनलाइन वाचन कट्टा याचे आयोजन करण्यात आले.त्यात विद्यार्थ्यांनी त्यांना आवडलेल्या कवितांचे वाचन आणि सादरीकरण केले.

**४) पत्रोत्सव :**

मराठी विभागाने 'पत्रोत्सव' उपक्रमांतर्गत दि. १ ते १२ ऑक्टोंबर दरम्यान ऑनलाइन पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन केले. त्यामध्ये प्रथम क्रमांक कु. ऋतुजा सुभाष मांडेकर(विषय - करोना, तू हे काय केलंस...?), द्वितीय क्रमांक कु. नवीन सुभाष डोंगरे (विषय- प्रिय, आई - बाबांस) आणि तृतीय क्रमांक प्रतीक्षा खराडे( विषय - आईस..) यांचे आले.

**५)दिवाळी अंक भेट कार्यक्रम**

दि. १२ नोव्हेंबर २०२० रोजी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन जागर अभियांनांतर्गतदिवाळी अंक भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन जागर अभियांनांतर्गतदिवाळी अंक भेट कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ.व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. एच. एम.जरे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते मराठी विभागातील विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात दिवाळी अंकांचे वाटप करण्यात आले

या प्रसंगी बोलताना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर म्हणाले की, दिवाळी अंक हा साहित्याचा अक्षर ठेवा असून वाचनवृद्धीसाठी दिवाळी अंकांचे योगदान महत्त्वाचे आहे. दिवळी अंक ही महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा असून वाचकप्रेमींसाठी ती वैचारिक पर्वणी असते.करोना काळात विद्यार्थ्यांना पुस्तकांशी जोडून ठेवण्याचे आव्हान आपल्या सर्वांपुढे असून महाविद्यालयातील मराठी विभाग यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. मराठी विभागाने राबविलेल्या वाचन जागर अभियानाचे कौतुक केले. उद्याच्या सुंदर दिवसांसाठी विद्यार्थ्यांना सतत वाचत राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले की, दिवाळीच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाचा फराळ दिला जातो. या वर्षी मराठी विषयाचे विशेषस्तरावर अध्ययन करणाऱ्या सुमारे ७५ विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचा युवा व बालकुमार दिवाळी अंक भेट देण्यात आलाआहे. तसेच लोकमत वर्तमानपत्राचे सुमारे १०० 'दीपोत्सव' नावाचे दिवाळी अंक विद्यार्थ्यांना देण्यात आले कोरोना काळ असल्याने महाविद्यालयात प्रातिनिधिक स्वरुपात विद्यार्थ्यांना दिवाळी अंकाचे वाटप केले असून उर्वरित विद्यार्थ्यांना पोस्टाच्या माध्यमातून दिवाळी अंक पोहचवलाअसल्याचे सांगितले. डॉ.बी.डी.अनुसे यांनी सर्वाचे आभार मानले.

**६)मराठी भाषा संवर्धन पंधरवडा:**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात दि. २० जानेवारी २०२१ रोजी मराठी भाषा पंधरवडा ( दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी) निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला. या प्रसंगी डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मराठी भाषा – साहित्य विकासक्रम या विषयावर विद्यार्थ्यांना बहुमोल असे ऑनलाईन मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, कला शाखेचे उपप्राचार्य आणि मराठी विभागप्रमुख डॉ संजय शिंदे उपस्थित होते. या ऑनलाईन संवाद सत्रात मराठी विषयाचे विशेष स्तरावर अध्यापन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या प्रसंगी बोलताना डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत मराठी भाषेचा विकासक्रम विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविला. ताम्रपट, शिलालेख या लिखित साधनांपासून महानुभाव, वारकरी संप्रदाय, पंडिती साहित्य, शाहिरी, बखर साहित्याचा आढावा घेतला. ब्रिटिश सत्तेच्या काळात मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या साहित्यप्रकारांचा कसा विकास घडून आला; या बद्दल त्यांनी माहिती सांगितली. १९६० नंतर मराठी साहित्यात आलेले ग्रामीण, दलित, आदिवासी आणि स्त्रीवादी साहित्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार डॉ. संजय शिंदे यांनी यांनी मानले

**७)विश्व मराठी संमेलन २०२१ :**

विश्व मराठी परिषदेच्या वतीने दि. २८ ते ३१ जानेवारी २०२१ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या online 'विश्व मराठी संमेलन २०२१' मध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने सहयोगी महाविद्यालय म्हणून सहभाग घेतला. यात महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक आणि पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले.

**८)मराठी भाषा गौरव दिन**

दि. २५ फेब्रुवारी २०२१ रोजी मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून कवी कुसुमाग्रज यांच्या कवितांच्या सादरीकरणाचा ऑनलाईन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दि. २६ फेब्रुवारी २०२१ रोजी मराठी राजभाषा दिनानिमित्त प्रा. साईनाथ पाचारणे यांचे 'समाजमाध्यमातून मराठीचा प्रचार/प्रसार या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ व्ही. डी. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. संजय शिंदे यांचे ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून कुसुमाग्रज यांचा दि २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो; असे त्यांनी सांगितले

**९)मराठी राजभाषा दिन : ई - विशेषांक -**

विद्यार्थ्यांच्या साहित्यिक सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी मराठी विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त (दि. २७ फेब्रुवारी ) मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून 'मोकळे आकाश' या ई - विशेषांकाची निर्मिती करण्यात आली. यामध्ये विभागातील प्राध्यापक आणि पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांचे लेखन समाविष्ट करण्यात आले.

या निमित्ताने 'मोकळे आकाश' या ई – विशेषांकाच्या प्रकाशन समारंभास खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, डॉ. एस. बी. पाटील, प्रा.ए.जी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, मराठी ही फक्त मातृभाषा, राजभाषा न राहता ज्ञानार्जनाची, ज्ञानसंवर्धनाची आणि ज्ञान देणारी भाषा होण्याची गरज आहे. ते पुढे म्हणाले, की मराठी भाषा ज्ञानभाषा होण्यासाठी इंग्रजीप्रमाणे विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, उद्योग, दळणवळण आणि कायद्याची भाषा म्हणून विकसित व्हायला हवी. भाषा हे संवादाचे प्रभावी माध्यम असून प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगायला हवा. उत्तम मराठी भाषा लिहिता - वाचता येणे हे आनंददायी असते मराठी भाषा समृद्ध असून मराठी साहित्याची गौरवशाली परंपरा आहे. या परंपरेतील साहित्यानुभव प्रत्येक मराठी जनाने घेण्याची गरज आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी परीक्षार्थी शिक्षण पद्धतीतून बाहेर पडून ज्ञानात्मक, गुणात्मक स्तर उंचविण्यासाठी स्वयं अध्ययनाला महत्त्व देऊन उपक्रमशीलता वाढवायला हवी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ बाळासाहेब अनुसे यांनी मानले

मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून दि. २५ रोजी कुसुमाग्रजांच्या कवितांचा 'काव्यजागर', दि. २६ रोजी डॉ. संजय शिंदे यांचे 'समाजमाध्यमातून मराठीचा प्रचार व प्रसार' या विषयावर व्याख्यान तर दि. २७ रोजी प्रा. साईनाथ पाचारणे यांनी लेखन कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन केले.

**१०) जागतिक महिला दिन** :

मराठी विभागाने आयोजित केलेल्या जागतिक महिला दिनानिमित्तच्या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. नीता डोंगरे यांनी 'उत्सव स्त्रीत्वाचा' या विषयावर विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गार्षण केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे उपस्थित होते

या प्रसंगी बोलताना प्रा. नीता डोंगरे म्हणाल्या की, उच्च शिक्षणाची संधी मिळालेल्या विद्यार्थिनींनी प्रामाणिकपणे शिकावं, आत्मनिर्भर व्हावं आणि आत्मसन्मानाने जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. प्रा. नीता डोंगरे पुढे म्हणाल्या की, जागतिक महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव असून महिलांच्या हक्कांचे रक्षण आणि स्त्रीसन्मानतेच्या दृष्टीने या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. या निमित्ताने विद्यार्थिनींनी शिक्षणातून स्वतःची क्षमता ओळखणे, त्या क्षमतांना न्याय देणे आणि भौतिक गोष्टीत अडकून न पडता वैचारिक प्रगल्भता जोपासणे गरजेचे आहे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वावलंबन या चतुसूत्रीच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी स्वतःला स्वयंपूर्ण करावे आणि स्वतःचे प्राधान्यक्रम निश्चित करून आपापल्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त मराठी विभागाने स्त्री - जाणिवांच्या कवितांचा काव्यजागर, महिला दिन हवा कशाला ? या विषयावर परिसंवाद, उंच माझा झोका या विषयावर विद्यार्थिनी मनोगते तसेच महिला दिनानिमित्त शुभेच्छा संदेशाची स्पर्धा असे विविध उपक्रम आयोजित केले या उपक्रमांत प्रतीक्षा खराडे, मंगल भदाणे, मयुरी साकोरे, निता गुरव, अश्विनी लडके, ऋतुजा मांडेकर, स्वाती सावंत इ. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपले विचार मांडले. अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महिलांचे आर्थिक सशक्तीकरण या विषयायावर उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले

**११) राष्ट्रीय वाचन दिन**

मराठी विभागाच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त (दि. १९ जून २०२१) 'चला वाचू या' उपक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि इतर अभिवाचक प्राध्यापक उपस्थित होते.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. वाचन संस्काराने येणारी बहुश्रृतता जीवन समृद्ध करते. यासाठी सर्वांनीच पुस्तकांना आपल्या जगण्याचा भाग बनवून त्यांच्याशी मैत्री करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. व्ही. डी कुलकर्णी पुढे म्हणाले, की तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ आले असले तरी तरुण पिढी समाजमाध्यमांचा अतिरेकामुळे भोवतालपासून दुरावत अधिकाधिक स्वतःत गुंतत चालली आहे. अशा परिस्थितीत पुस्तकं आपल्याला जगाशी, भोवतालशी जोडून ठेवतील. त्यासाठी वाचनसंस्कार रुजविणे गरजेचे आहे.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केरळमधील पुस्तक आंदोलनाचे जनक पी.एन. पैनिकर यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय वाचन दिनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून 'चला वाचू या' या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी अभिवाचन कार्यक्रमाद्वारे उत्तमोत्तम साहित्य नव्या पिढीसमोर आणण्यासाठी मराठी विभागाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. 'वाचण्यासाठी शिका आणि शिकण्यासाठी वाचा' या मंत्रानुसार सर्वांनीच वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

वाचन दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्राध्यापकांनी त्यांच्या आवडीच्या ग्रंथांचे अभिवाचन केले. विद्यार्थ्यांनीही ऑनलाईन पद्धतीने या उपक्रमात सहभाग घेतला. ग्रंथालय विभागातर्फे फेसबुकवर बोलती पुस्तके या विषयी माहिती व पुस्तके उपलब्ध करून त्याची लिंक व्हॅट्सअँपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये प्रसारित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार ग्रंथपाल प्रा पूनम तापकीर यांनी मानले.

**१२) ई कंटेट निर्मिती** -

करोनाच्या पार्श्वभूमीवर सबंध वर्षभर विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने अध्यापन केले. परिणामी विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य (स्टडी मटेरियल) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आम्ही घेतली. यानुसार महाविद्यालयाच्या वेबसाईटवर आम्ही एकूण १५० हून अधिक पीडीएफ स्वरूपातील अध्यापन साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहे.

**१) संशोधन कार्य** –

या शैक्षणिक वर्षात डॉ. संजय शिंदे यांचे मान्यताप्राप्त जर्नलमध्ये २ रिसर्च पेपर आणि संदर्भग्रंथात २ लेख प्रसिद्ध झाले आहे. तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांचा१ रिसर्च पेपर प्रकाशित झाला आहे.

**१४)वेबिनार सहभाग -**

याशिवाय महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या २० हून अधिक वेबिनारमध्ये मराठी विभागातील प्राध्यापक आणि पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले.

डॉ. संजय शिंदे
**मराठी विभाग प्रमुख**
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.